**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.11 No.4** **March – April 2024**

# ई- शासन प्रणाली

**प्रा. डॉ. अण्णासाहेब गणपती हरदारे**
*सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, शिवराज कला, वाणिज्य महाविद्यालय आणि डी.एस.कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज.*
*Corresponding Author -* ***प्रा. डॉ. अण्णासाहेब गणपती हरदारे***
**DOI - 10.5281/zenodo.10872766**

**सारांश :**

*आजचे जग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. या युगामध्ये तंत्रज्ञानाची होत असणारी प्रगती व त्यातून मानवी जीवनाचे साफल्य होत असताना दिसते. संगणक, मोबाईल इंटरनेट सोशल मीडिया यामुळे जग आज अत्यंत जवळ आले आहे असे वाटते त्यामुळे आज जगाला जागतिक खेड्याप्रमाणे महत्त्व आलेले आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे वारे संपूर्ण जगभरात वाहू लागल्यामुळे शासकीय प्रशासकीय यंत्रणेमध्ये देखील पेपरलेस वर्किंग, व पारदर्शकता उत्तरदायित्व गती आणण्यासाठी सर्वच ठिकाणी इ गव्हर्नन्स किंवा इ शासनाचा प्रयोग होताना दिसत आहे. ई गव्हर्नन्स चा प्रसार व प्रचार होण्यासाठी तसेच प्रशासकीय व शासकीय कार्यात पारदर्शकता व गतिशीलता आणण्यासाठी भारतामध्ये कशा पद्धतीने ई गव्हर्नन्स ची सुरुवात झाली; याचा अभ्यास या प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.*

***पारिभाषिक शब्द : तंत्रज्ञान, इंटरनेट ,जी टू सी, जी टू बी, जी टू जी, जी टू इ, कल्याणकारी राज्य, सुशासन इत्यादी***

**प्रस्तावना :**

आजचे युग हे जागतिकीकरणाचे, मुक्त अर्थव्यवस्थेचे युग आहे. त्याचप्रमाणे माहिती व तंत्रज्ञान याला फार महत्त्व आले आहे कंप्यूटर ,मोबाईल, इंटरनेट ,सोशल मीडिया यामुळे जग अत्यंत जवळ आले आहे. ते एखाद्या खेड्याप्रमाणे(Global Village) वाटते .माहिती व तंत्रज्ञानाच्या जगात पूर्ण बदलाचे वारे वाहत आहे तर प्रशासन हे सुद्धा या बदलापासून वेगळे राहिलेले नाही .आज जगभरात माहिती व तंत्रज्ञानाचा वापर होत असताना शासन व प्रशासन हे सुदृढ व पारदर्शक होण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर होताना दिसतो. माहिती व तंत्रज्ञानामुळे शासनाचे व प्रशासनाचे सर्व अंग विभाग एकमेकांशी जवळ येत आहेत. शासन व प्रशासनात पारदर्शक पारदर्शकता येत आहे. सामान्य लोकांपर्यंत प्रशासन पोहोचताना दिसत आहे.

भारतातही १९९० नंतर ही शासनाची सुरुवात झाल्याचे आपणास दिसते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ईशासनाची सुरुवात व भारतातील त्याचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे; व ई शासनाच्या यशस्वीतेसाठी किंवा तीन शासनाच्या प्रसारासाठी झालेले प्रयत्न यांचा विचार करण्यात आलेला आहे.

**उद्दिष्टे :**

१) इ गव्हर्नन्स ही संकल्पना समजून घेणे.

२) माहिती व तंत्रज्ञानात झालेले क्रांती प्रचार व प्रसार अभ्यासणे
३) शासन व जनता यांच्यात ई-शासन माध्यमातून वाढत असलेला परस्पर संपर्क व त्याचे कारणे अभ्यासणे.
४) भारतामध्ये १९९० नंतर ई-शासनचे आगमन फायदे व तोटे अभ्यासणे.
५) इ प्रशासन संकल्पने ने जगभरात व भारतीय प्रशासनात आलेला बदल अभ्यासणे

**विषय प्रवेश :**

**जागतिकीकरण व प्रशासकीय परिणाम:** २१ व्या शतकात जागतिकीकरणाच्या संदर्भात शासन संकल्पनेची विशेष चर्चा होताना दिसत आहे. त्याचा केंद्रबिंदू व्यक्ती आहे, व्यक्तीला अधिका अधिक स्वातंत्र्य असावे व व्यक्ती जीवनात कमीत कमी हस्तक्षेप असावा. १९९० नंतर दृढ झालेला विचार आहे. इ शासन म्हणजे काय- सुशासन गुड गव्हर्नन्स हा शब्द सु शासन+ शासन या दोन शब्दांचा मिळून तयार झाला आहे याचा अर्थ चांगले शासन होय. याच अर्थाने विचार केला असता आपणास असे म्हणता येईल की व्यक्ती विकासाचा केंद्रबिंदू मानून त्याच्या सर्वांगीण विकास साधत असताना शासनाने व्यक्ती विकासास सर्वतोपरी मदत करावी व्यक्तीचा विश्वास आपल्या शासन व प्रशासन दृढ होण्यास मदत होते

**कल्याणकारी राज्य व ई शासन-** आज जगभरात कल्याणकारी राज्य आहेत/ उदयाला येत असताना एखाद्या देश कल्याणकारी आहे किंवा नाही किंवा किती प्रमाणात आहे हे पाहण्यासाठी तेथील व्यक्ती विकास प्रमाण मानले जाते. एखादा देश कल्याणकारी आहे किंवा नाही किंवा त्या देशाला कल्याणकारी बनवण्यासाठी त्या व्यक्तीचा विकास महत्त्वाचा आहे; व त्यासाठी ई शासन अत्यंत महत्त्वाची भूमिका दिसते कारण प्रशासन हा व्यक्तीचा सर्वांगीण विकास यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडताना दिसते. शासनामुळे जनता व शासन यांचा संपर्क वाढतो पारदर्शकता येते व व्यक्तीचा विकास होताना दिसतो.

**ई- शासनाचे स्वरूप-** शासनाच्या सर्व अंगांना विभागांना नवनवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देवाण-घेवाण कार्य असल्याचे आपणास दिसते. त्याचप्रमाणे इंटरनेट /हबच्या प्रभावी वापर करून सक्षम ,पारदर्शकता, जबाबदारी, कार्य तत्परता, परिणामकारकता यांना नजरेसमोर ठेवून आज सुधारणा घडवून आणणे.

**ई प्रशासनात होत असलेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग-** जवळ सर्वच प्रशासनात माहिती तंत्रज्ञान संगणक व संचार प्रणालीचा वापर होत असलेला आपणास दिसतो.

**संगणकीकरण-** आज सर्व सरकारी कार्यालयांमध्ये संगणक व्यवस्थेने सुसज्ज झालेल्या आपणास दिसतात यामुळे प्रशासन व्यवस्थित झालेले दिसते माहितीचे संकलन आकडेवारीत एकत्रितपणा आलेला दिसतो

**इंटरनेटचा वापर सर्वत्र-** सरकारी दप्तरांमध्ये मंत्रालयांमध्ये माहितीची आकडेवारीची देवानघेवाण नेट द्वारे जोडणी/ हब यांचा वापर होत असताना दिसतो.

**जनतेसाठी ऑनलाईन व्यवस्था-** आज प्रत्येकाकडे भाव असताना सुविधांसाठी ऑनलाईन माहितीची व्यवस्था एप्लीकेशन, वेबसाइट्स याद्वारे होताना दिसते. उदाहरणार्थ-**ऑनलाइन संपर्क यंत्रणा-** प्रशासकीय अधिकाऱ्यांना ऑनलाइन आपलिकेशन च्या माध्यमातून संपर्क करून माहिती मागवणे ,तक्रार करणे , आपले विचार नोंदवणे किंवा संपर्क साधने या माध्यमातून वेळेचा अपव्यय वाचवून प्रशासनाचा लाभ उठवणे

**भारत व ई- शासन:**

१९८० नंतर नवीन आर्थिक धोरणाचे वारे वाहू लागले सुधारणांचे प्रयत्न होताना आपणास दिसते त्यातून खऱ्या अर्थाने या माहिती व तंत्रज्ञानाच्या क्रांती सुरुवात झाली असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. भारतीय प्रशासन सुद्धा

सुरुवातीला फॅक्स, फोन, संगणक, मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया या विकास व क्रांतीपासून भारतीय प्रशासन लांब राहिले नाही. भारत व ईशासन इतिहास- भारताने जागतिक बदल पाहता १९७०मध्येच इलेक्ट्रॉनिक विभाग केले त्यांच्या काळात १९७७ मध्ये राष्ट्रीय सूचना केंद्र ( international information centre)मध्ये त्याचे रूपांतर केले. याला भारताचे इ -शासनाकडे टाकलेले पहिले पाऊल म्हणता येईल १९८७ मध्ये निकटन या राष्ट्रीय उपग्रह आधारित संगणक नेटवर्कच्या माध्यमातून ई-शासनावर भर देण्यात आला व जिल्ह्यातील जिल्हा अधिकारी कार्यालय जोडण्यात आली व सर्व जिल्हा अधिकारी कार्यालयांना दिसणारे म्हणजेच hardware व न दिसणारी म्हणजेच software व्यवस्था व साहित्य पुरवण्यात आले व नंतरच्या काळात 1999 मध्ये केंद्रस्तरावर माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाची स्थापना झाली.

**ई -शासनासाठी बारा कलमी कार्यक्रम:**

1. प्रत्येक मंत्रालय हार्डवेअर व सॉफ्टवेअर पुरवणे.
2. कर्मचारी वर्गाला संगणक प्रशिक्षण देणे.
3. प्रत्येक विभागातील माहिती ही digital करणे.
4. दैनंदिन कार्यात software चा वापर करणे.
5. सर्व आवश्यक माहिती सर्वसामान्यांसाठी इंटरनेट द्वारे वेबसाईट द्वारे एप्लीकेशन द्वारे उपलब्ध करणे.
6. प्रशासकीय विभाग व मंत्रालय आपल्या वेबसाईट बनवून तिची एकसूत्रता आणणे.
7. वेबसाईट वरील माहिती हिंदी भाषा मातृभाषेत असावी.
8. प्रशासकीय सुधारणा जनतेच्या तक्रारी यांच्यासाठी सॉफ्टवेअरचा वापर करावा.
9. अंतर्गत बैठका, सूचना, संमेलने, परिपत्रक जीआर, नोटीसा वेबसाईटवर एप्लीकेशन वर ठेवणे.
10. प्रत्येक विभागाने तेथे येणाऱ्या जनतेसाठी तांत्रिक सेवा पुरवणे.
11. विभागाने मंत्रालयाने स्वतःची वेबसाईट अध्ययवत /अप टू डेट ठेवणे.
12. प्रत्येक विभागाने पाच वर्षाचे नियोजन व कार्य बनवणे.

भारतामध्ये १८ ऑक्टोबर २००० नुसार इ शासनास वैधानिक दर्जा प्राप्त झाला आहे. भारतामध्ये २०१० पासून ७६००० सामान्य सेवा केंद्र नावाने विभाग जनतेला सेवा देताना दिसतात. उदाहरणार्थ - सेतू सुविधा, भूमी ज्ञानदूत, स्मार्ट कार्ड, ई- चौपाल (कृषी), ई-परीक्षा इत्यादी.

**महाराष्ट्र व ई प्रशासन:**

ज्याप्रमाणे भारतात १९९० पासून इ प्रशासन ची सुरुवात झाली त्या पद्धतीने महाराष्ट्रातही सुधारणा झालेल्या आपल्याला दिसून येते केंद्राने सुचवलेले सुधार महाराष्ट्र मध्ये ही राबवलेले आपणास दिसतात. महाराष्ट्रामध्ये देखील ईशासनाच्या दृष्टिकोनातून बरेच प्रयत्न झाल्याचे दिसतात.

**ई-प्रशासनाचे स्वरूप:**

१) g2c- यामध्ये शासन आणि नागरिक किंवा सेवा प्राप्त करणारे ग्राहक यांचा परस्पर प्रक्रिया चा समावेश होतो

२) g2b- या प्रक्रियेत ई- प्रशासनाचा कोणत्याही मर्यादा न बाळगता व्यवसायासंबंधी देयके प्रक्रियेशी संबंधित असतात

३) g2g- यामध्ये केंद्र सरकार, राज्य सरकार, राज्य सरकार व स्थानिक शासन यांच्याशी माहितीची देवाण-घेवाण केली जाते

४) g2e- शासन व कर्मचारी त्याचप्रमाणे संघटना व कर्मचारी यांच्यातील ही द्वि मार्ग प्रक्रिया आहे

**ई- प्रशासनाचे फायदे :**

१) उत्तम सेवा वितरण- इ प्रशासनाची कार्यक्षमता गती व गुणवत्ता वाढवणे नोकरशाही कमी करणे व नागरिकांची सेवा करणे.

२) पारदर्शकता व उत्तरदायित्व- माहिती नागरिकांना सहज उपलब्ध करून देणे पारदर्शकतेला प्रोत्साहन देणे भ्रष्टाचार कमी करणे.

३) नागरिकांचे सक्षमीकरण- नागरिकांना शासनाच्या प्रक्रियेत सहभाग वाढवणे चा निर्णयावर अभिप्राय व चिंता नागरिक व्यक्त करू शकतात.

४) डिजिटल समावेश व दुरावा दूर करणे- इ शासन माध्यमातून ग्रामीण भाग व उपेक्षित समाज यांचा सहभाग वाढवला जातो इ शासनाच्या माध्यमातून या उपेक्षित घटकापर्यंत पोहोचता येते.

५) खर्च,कार्यक्षमता व संसाधन सर्वोत्तमीकरण- इ शासनावरील प्रशासकीय खर्च कागद खर्च नोकर खर्च कमी करणे व शासन- जनता सेतू उपलब्ध करणे.

६) सुलभ व्यवसायिकीकरण- ऑनलाइन व्यवसाय नोंदणी करणे डिजिटल फायलिंग करणे यामुळे व्यवसायात प्रोत्साहन देणे गुंतवणुकीत वाढ करणे प्रोत्साहन देणे यामुळे व विकासाला हातभार लागतो.

७) डेटा संकलित निर्णय घेणे- इ शासन मोठ्या प्रमाणात डेटा करून देते त्यामुळे निर्णय प्रक्रियेत माहितीचा त्याचा उपयोग केला जाऊ शकतो.

८) आपत्ती व्यवस्थापन व आपत्कालीन प्रतिसाद- संकलित माहितीचा वेळेवर प्रसार विविध विभागामधील समन्वय संकट काळात मदत आणि सहाय्यक सेवांचे असे कार्यक्षम वितरण सक्षम करणे करणे.

**तोटे-** भारतात इ गव्हर्नन्स चे अनेक फायदे असले तरी तोटे नजरे आड करून चालणार नाहीत ते खालील प्रमाणे आहेत.

१) डिजिटल उपकरण- विशेषता ग्रामीण भागात सर्व नागरिकांना इंटरनेट तंत्रज्ञान यांचे पूर्ण ज्ञान नाही त्यामुळे हे सर्व समावेशकता या उद्दिष्टांना अडथळा होतो

२) तांत्रिक पायाभूत सुविधा- इ प्रशासन मजबूत होण्यासाठी तांत्रिक सुविधा इंटरनेट कनेक्शन फार महत्त्वाचे आहे परंतु भारतासारख्या विकसनशील देशात या सुविधा उपलब्ध करणे हे फार कठीण असल्याचे दिसते.

३) डिजिटल साक्षरता व तांत्रिक शिक्षणाचा अभाव- नाच्या विकासासाठी म्हणता डिजिटल साक्षर असणे गरजेचे आहे परंतु भारताच्या काही घटकात डिजिटल साक्षरते विषयी उदासीनता दिसते त्यामुळे इ प्रशासनाचा उद्देश पूर्ण सफल होताना दिसत नाही

४) सुरक्षा व गोपनीयतेची चिंता- इ प्रशासनात मोठ्या प्रमाणात वैयक्तिक डेटा चे संकलन व संचयन होत असताना दिसते परंतु सायबर सुरक्षा हा फार महत्त्वाचा मुद्दा आज झाला आहे

५) तंत्रज्ञानावरील अवलंब- इ प्रशासन हा पूर्णतः डिजिटल उपकरणावर आधारित आहे तांत्रिक बिघाडीमुळे व्यवस्थापन ठप्प होणे व दिरंगाई होत.

६) बदलाची प्रक्रिया डिजिटल विभाग-

जुन्या परंपरावादी व्यक्ती / जनतेकडून किंवा सोयी सुविधा नसलेल्या उपेक्षित समाजाकडून इ गव्हर्नन्स ला विरोध होताना दिसतो

**सध्या जागतिक परिस्थिती व ई- गव्हर्नन्स :**

आज जगाची परिस्थिती पाहता प्रगत अप्रगत विकसनशील अशी स्तरामध्ये जगाची

विभागणी असलेली आपणास दिसते यामुळे गुड गव्हर्नन्स व दुसरीकडे गुड गव्हर्नन्स साठी असलेले अनेक अडथळे नजरेस येतात अशा असंतुलित झालेल्या जगाची विभागणी संतुलित कशी केली जावी हा जगासमोर फार मोठा प्रश्न असल्याचे आपणास दिसतो प्रशासनाच्या सर्वच कार्यामध्ये आज माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होताना दिसतो त्यामुळे आज इ शासनाची गरज मोठ्या प्रमाणावर असल्याचे जाणवते दप्तर दिरंगाई, भ्रष्टाचार, लालफितीचा दोष यासारखे दोष प्रशासनातून कमी होत असताना दिसत आहेत त्याचे श्रेय इ गव्हर्नन्स ला देणे महत्त्वाचे ठरते. संगणक इंटरनेट सोशल मीडिया याचा प्रशासनासाठी देखील आज मोठ्या प्रमाणावर वापर होत असताना दिसत आहे या तंत्रज्ञानाच्या वापरामुळेच आज जगाचे रूपांतर जागतिक खेड्यामध्ये( ग्लोबल विलेज) झाल्याचे दिसते. संपूर्ण जग आज जवळ असल्याचे जाणवते.

**समारोप :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये इ गव्हर्नन्स म्हणजे काय हे याचा अभ्यास करून ई- गव्हर्नरच्या यशस्वीतेसाठी राबवण्यात आलेला बारा कलमी कार्यक्रम त्याचबरोबर ई- गव्हर्नर चे फायदे तोटे यांचा विचार यामध्ये करण्यात आलेला असून भारतीय प्रशासनामध्ये व जागतिक पातळीवर ई- गव्हर्नर चा प्रसार कसा व कितपत प्रमाणात झालेला आहे व ई- गव्हर्नन्स च्या यशस्वीतेसाठी मार्गाचा वापर करता येईल याचा अभ्यास या शोध निबंधात करण्यात आलेला आहे.

**संदर्भ:**

१) Gupta D. N. (2008), “E-Governance: A Comprehensive Framework”, New Century Publications, New Delhi.
२) Gregory G. Curtin, Michael Sommer, (2003) , “World Of E-Government”, Routledge Publication, New Delhi
३) Subhash Bhatnagar, (2009), “E-Government: From Vision to Implementation - A Practical Guide With Case Studies”, SAGE Publications Pvt. Ltd , Pune.
४) शिरपूरक दीपक, (२००९), “ई-गव्हर्नंन्स”, मेनका प्रकाशन, पुणे
५) दैनिक महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्र
६) दैनिक लोकसत्ता वृत्तपत्र